जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in




## -:प्रेस नोट :-

दिनांक :- १२/०५/२०२६

# " जळगांव पोलीसांची मोठी कारवाई: पारोळा येथे बेकायदेशीर रसायन साठयावर छापा टाकत एकुण 9,32,125/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त "

===०००===

दिनांक ११ मे २०२६ रोजी **मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव यांना गुप्त बातमीदार कडुन माहिती मिळाली की,** राष्ट्रीय महामार्ग क्र. 53 लगत म्हसवे शिवारात रामदेव राजस्थानी चौधीरी हॉटेल च्या मागील बाजुस आरोपीत नामे दिनेश पोपटराव पाटील हा इसम असुरक्षितरित्या लोकांचे जिवीताला व मालमत्तेला धोका निर्माण होईल अशा रितीने 'सोडियम बाय सल्फेट' रसायनांचा बेकायदेशीर रित्या साठवणुक करुन काळ्या बाजारात विक्री करीता स्वत:चे कब्याज बाळगत आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव यांनी तात्काळ पारोळा पोलीस स्टेशन येथील अधिकारी/अंमलदार यांचे पथक तयार करुन कायदेशिर कारवाई करणे मार्गदर्शन करतआदेशीत केले.

दिनांक ११ मे २०२६ रोजी तयार करण्यात आलेल्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता, आरोपीत नामे दिनेश पोपटराव पाटील वय 43 रा. प्रकाश टाकीचे मागे खांडेकर वाडा, पारोळा जि. जळगांव हा खालील मुद्देमालासह मिळुन आला

| | | |
|---|---|---|
| 1) | 4,50,000/- | रु. किंमतीचा MH-04-FJ-5229 टाटा कंपनीचा 12 चाकी टँकर |
| 2) | 91,000/- | रु. किंमतीचा MH-04-FJ-5229 या ट्रॅक्टरमध्ये अर्धवट भरलेले अंदाजे 10,000 लिटर असलेले रसायनयुक्त पदार्थ (उग्र वासाचे) प्रति 1 लिटर 9.1 रुपये किंमतीचे. |
| 3) | 2,04,750/- | रु. किंमतीचे 7 टाक्या प्रत्येकी 5 हजार लिटर मापाच्या त्यातील 4 टाक्या पूर्ण भरलेल्या व 1 टाकी अर्धवट भरलेली असे एकूण 22,500 लिटर असलेले रसायनयुक्त पदार्थ (उग्र वासाचे) प्रति 1 लिटर 9.1 रुपये किंमतीचे. |
| 4) | 1,36,500/- | रु. अं.कि.जु.वा. जुना टँकर जमिनीवर ठेवलेला त्याचे अंदाजे क्षमता 15,000 लिटर भरलेले रसायनयुक्त पदार्थ (उग्र वासाचे) प्रति 1 लिटर 9.1 रुपये किंमतीचे. |
| 5) | 11,375/- | रु. अं.कि.जु.वा. निळ्या रंगाच्या 15 टाक्या असून 1 टाकीची क्षमता 250 लिटर त्यातील 5 टाक्या एकूण टाक्या पूर्ण भरलेल्या असे एकूण 1250 लिटर असलेले रसायनयुक्त पदार्थ (उग्र वासाचे) प्रति 1 लिटर 9.1 रुपये किंमतीचे. |
| 6) | 20,000/- | रु. किंमतीची मोटरसायकल |
| 7) | 10,000/- | रु. किंमतीचा VIVO कंपनीचा मोबाईल |
| 8) | 5500/- | रु. अं.कि.जु.वा. जमिनीवर खाली पडलेले रिकामे टँकर. |
| 9) | 3000/- | रु. अं.को.जु.वा. 1 HP मोटर |

**एकुण - 9,32,125/- रु. अंदाजे किंमतीचा मुद्देमाल.**

त्यानुशंगाने सदर आरोपीता विरुध्द पारोळा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. १६४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम २७१, २७२, २८६, २८७, २८८, ३१६(३), ३१७(२) सह अत्यावश्यक वस्तू अधिनियम कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयांचा पुढील तपास सपोनि/योगेश महाजन, पारोळा पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**



